वर्ष ३४ | जानेवारी २०२६ | अंक १ | ३९७

पॉप्युलर प्रकाशन

प्रिय रसिक

आपल्यासाठी आणि मित्रांसाठी

३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६, दूरध्वनी : ०२२ - २३५३०३०३
Email: info@popularprakashan.com / Website: www.popularprakashan.com
/popularprakashan popularprakashan @PopularPrakashn

अंकविशेष

जयपूर लिटरेचर फेस्टिवलमध्ये पॉप्युलर प्रकाशनावर विशेष सत्र !



चित्रालोक : समकालीन दृश्यकलेतील भारतीयत्वाचा शोध

– दीपक घारे

जीवन जगण्याच्या अशा सवयीत जेव्हा मी मरेन...
स्मरण : विनोद कुमार शुक्ल

– प्रफुल्ल शिलेदार

दास्तान-ए-तुर्की
ट्युलिपच्या बागा माझ्या छायेत

– प्रवीण कलंत्री

Popular Prakashan
A Century of Seeding Culture

जयपूर लिटरेचर फेस्टिवलमध्ये पॉप्युलर प्रकाशनावर विशेष सत्र !

पॉप्युलर प्रकाशनच्या शताब्दी वर्षपूर्तीनिमित्त जयपूर लिटरेचर फेस्टिवलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ‘Popular Prakashan : A Century of Seeding Culture’ या विशेष सत्रात लेखक व राष्ट्रीय प्रवक्ते अनिश गवांदे यांनी पॉप्युलर प्रकाशनाचे प्रकाशक हर्ष भटकळ यांची सविस्तर मुलाखत घेतली.

या संवादातून पॉप्युलर प्रकाशनाचा शंभर वर्षांचा प्रदीर्घ गौरवशाली प्रवास, मराठीसह भारतीय भाषांतील साहित्यनिर्मितीतील योगदान, बदलत्या काळानुसार प्रकाशनविश्वात केलेले प्रयोग तसेच वाचक, लेखक आणि निर्मितीमूल्य यांच्याशी जपलेले नाते यावर सखोल चर्चा झाली. वेगवेगळ्या धाटणीच्या पुस्तकांसोबतच विविध प्रवृत्तींच्या लेखकांसोबतचे घनिष्ट संबंध, पुस्तकांच्या आशयातील वैविध्य, आधुनिक काळात बदललेल्या वाचनकक्षा, वाचकांची बदललेली अभिरुची, ईबुक्स, बेस्टसेलर पुस्तकांचे निकष, पायरसी आणि प्रकाशन क्षेत्रातीलआव्हाने अशा बहुविध घटकांवर या सत्रात चर्चा झाली.

जयपूर लिटरेचर फेस्टिवलसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित व्यासपीठावर पॉप्युलर प्रकाशनाच्या गौरवशाली परंपरेचा सन्मान करण्यात आला, ही मराठी साहित्यविश्वासाठी अभिमानाची बाब आहे. पॉप्युलर प्रकाशनाच्या कार्यावर विशेष सत्र आयोजित करून त्यावर विचारमंथन घडवून आणल्याबद्दल जयपूर लिटफेस्टच्या आयोजकांचे मनःपूर्वक आभार.

या सत्राशिवाय जयपूर लिटरेचर फेस्टिवल अंतर्गत बुकमार्कमध्ये 'मराठी प्रकाशन : वैभवी परंपरा आणि आश्वासक भवितव्य' असे एक सत्र पार पडले. या सत्रात

मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, सकाळ प्रकाशनाचे आशुतोष राजगीर, रोहन प्रकाशनाचे रोहन चंपानेरकर, जोत्स्ना प्रकाशनाचे विकास परांजपे यांचा सहभाग होता. पॉप्युलर प्रकाशनाच्या हर्ष भटकळ यांनी या मान्यवरांशी संवाद साधला. मराठी प्रकाशनक्षेत्र आणि नव्या दृष्टीने काहीएक विचार घेऊन वाटचाल करणारे प्रकाशक, वाचकांचा कल आणि पुस्तकनिर्मिती, कथात्म साहित्यातील रुची कमी होऊन मोटिवेश्नल, ऐतिहासिक कादंबऱ्या वाचणाऱ्यांची वाढती संख्या अशा विविध प्रश्नांवर पोषक चर्चा या सत्रात पार पडली. मराठी भाषा विभाग या सत्राचे प्रायोजक होते. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाचा या महोत्सवातील सहभाग ही घटनाही या दृष्टीने महत्त्वाची वाटते.

ही दोन्ही सत्रे लवकरच जयपूर लिटरेचर फेस्टिवलच्या अधिकृत युट्युब चॅनेलवर उपलब्ध होतील. साहित्यप्रेमी, वाचक, लेखक आणि प्रकाशन क्षेत्रात नव्या वाटा चोखाळणाऱ्यांसाठी ही चर्चा निश्चितच महत्त्वाची आणि प्रेरणादायी ठरेल.

*मराठी साहित्यिकांमध्ये दृश्यकलेबद्दल मर्मदृष्टी असणारे जे काही मोजके लेखक आहेत त्यांपैकी वसंत आबाजी डहाके हे एक महत्त्वाचे नाव आहे. डहाके यांची रेखाचित्रे पाहिली तर त्यात रेषेचा वापर त्यांच्या कवितेइतकाच समर्थपणे केलेला आढळतो. दृश्यकलेबद्दल त्यांनी अनेकदा लिहिले आहे. **चित्रालोक** हे पुस्तक म्हणजे अशा लेखांचा संग्रह आहे...*

वसंत आबाजी डहाके लिखित

चित्रालोक

समकालीन दृश्यकलेतील भारतीयत्वाचा शोध

दीपक घारे

चित्रालोकमधील लेख हे लेख गेल्या दहा-बारा वर्षांमधले आहेत. यातली देशी-परदेशी चित्रकारांची नावे पाहिली तरी त्यावरून डहाके यांच्या अभिरुचीची कल्पना येते. ती आधुनिकतेला भारतीय सौंदर्यदृष्टीने आपलेसे करू पाहणारी

आहे. सामाजिक वास्तव आणि त्याचे विरुपात्मक दर्शन याला एक वेगळे मूल्य मानणारी आहे. परदेशी चित्रकारांपैकी व्हॅन गॉग, रेनी मॅग्रिट, हेन्री रुसो, साल्वादोर दाली, पॉल क्ली, एम. सी. एशर या चित्रकारांबद्दल, त्यांच्या कलाकृतींबद्दल डहाके ह्यांनी लिहिले आहे. भारतीय चित्रकारांपैकी सुधीर पटवर्धन यांच्यावर चार लेख आहेत. प्रभाकर बरवे यांच्या **चित्र–वस्तुविचार** या पुस्तकाला लिहिलेली प्रस्तावना आहे. दि. के. बेडेकर, संभाजी



कदम यांच्या सौंदर्यविचारावर भाष्य आहे. जे. स्वामिनाथन, मुखपृष्ठ चित्रकार बाळ ठाकूर, छायाचित्रकार संदेश भंडारे अशा विविध माध्यमांमध्ये काम करणाऱ्यांची दखल डहाके ह्यांनी या लेखसंग्रहात घेतलेली आहे. यामागे भारतीय आणि पाश्चात्त्य चित्रकलेचा एक नकाशा सादर करण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले आहे. पण यात पृष्ठभागावरचे कलेचे निवळ अक्षांश रेखांश रेखाटण्यामध्ये त्यांना रस नाही. त्यांची शोधक वृत्ती रमते ती कलाकृतीच्या आणि पर्यायाने कलावंताच्या माइंड मॅपिंगमध्ये म्हणजेच

त्याच्या मानसिक अवकाशाचा वेध घेण्यामध्ये. त्यामुळे व्हॅन गॉग, ब्रॉयघेल, सुधीर पटवर्धन तसेच एशर, दाली, पॉल क्ली आणि प्रभाकर बरवे ह्यांच्या कामामधील समान अंतःसूत्रे त्यांना जाणवतात.

‘जवळ आणि दूर’, ‘आत / बाहेर’ या पटवर्धनांच्या चित्रांमधून येणाऱ्या काही संकल्पना. याच शीर्षकांच्या लेखांमध्ये ‘इराणी रेस्टॉरंट’, गिरणगावाचे चित्रण करणारे ‘परळ’ अशा पटवर्धनांच्या गाजलेल्या कलाकृतींवर डहाके ह्यांनी लिहिले आहे. वास्तव हे एकेरी, एका रेषेवरचे नसते. वास्तवाला अनेक पातळ्या असतात. शहरी जीवनातील ताण, असुरक्षितता, हिंसा हे सारे सामान्य माणसाला मध्यवर्ती ठेवून, पटवर्धनांनी वास्तव – अवास्तव

इराणी रेस्टॉरंट, १९७७, सुधीर पटवर्धन

सीमेवरचे महानगरी विश्व उभे केले. स्त्री-पुरुषांच्या तथाकथित सहजीवनातील शोकात्मता ‘इनर रूम आणि इरेझ’सारख्या चित्रांमध्ये आलेली आहे. डहाके ह्यांनी सूक्ष्मपणे हे सारे उलगडून दाखवले आहे. यांपैकी एका चित्रात संवाद तुटलेल्या व्यक्तींच्या अवकाशात आतल्या खोलीत प्रेते पडलेली आहेत. मध्यमवर्गीय कुटुंबातील आलेल्या एकाकीपणामुळे त्यांच्या मनाचे शवागारात रूपांतर झाले आहे असे डहाके यांना वाटते.

रेखाचित्रविचार : एक संवाद यात रणजित होस्कोटे ह्यांनी पटवर्धन यांच्या रेखचित्रांवर केलेले भाष्य आहे. सामाजिक ऐक्याला जेव्हा-जेव्हा धोका निर्माण झाला तेव्हा-तेव्हा जमाव या विषयावर पटवर्धनांनी रेखाचित्रे व रंगचित्रे केली. सामाजिक ऐक्याला पडलेले तडे सांधण्याचा तो एक प्रयत्न होता. जे रंगचित्रांतून लोकांपर्यंत पोचवता येत नाही ते रेखाचित्रांतून पोचवता येते. रेखाचित्रे हा एक प्रकारे चित्रकाराचा श्वासोच्छ्वास असतो. पटवर्धनांच्या चित्रातील

वास्तव केवळ वर्णनात्मक नसते. तो स्व आणि जग यांच्यात सतत चाललेला वाद-संवाद असतो. त्याचा रोख सामाजिक आणि नैतिकही असतो. एकीकडे अपूर्णतेची जाणीव व वर्धन (वाढ) आणि दुसरीकडे पूर्णता व थांबणे यांमध्ये निवड करताना माणूस चिरवेदना अनुभवत असतो. पटवर्धन ह्यांच्या चित्रांमध्ये या चिरवेदनेची अवस्थांतरे दिसतात. आपणही या अवस्थांतराचे साक्षीदार बनतो, असे डहाके म्हणतात.

सुधीर पटवर्धन आणि प्रभाकर बरवे हे दोघेही पूर्णतः भिन्नपणे व्यक्त होणारे चित्रकार. पण डहाके ह्यांना बरवेही तितकेच महत्त्वाचे वाटतात. बरवे यांच्या चित्रांचे विश्लेषण डहाके ह्यांनी अगदी वेगळ्या प्रकारे केलेले आहे. पटवर्धन यांचे चित्रचिंतन मुख्यतः मुलाखतींमधून आलेले आहे. तर बरवे यांचे आत्मचिंतन डायरींमधील मुक्त नोंदींमधून आलेले आहे. या बाबतीत त्यांचे पॉल क्लीशी नाते जुळते.



डहाके ह्यांनी बरवे यांच्या कलेची मीमांसा करताना संस्कृत साहित्यशास्त्रातील संकल्पनांचा आधार घेतला आहे. ते कुणाला पटो वा न पटो, पण त्यातून आस्वाद आणि समीक्षेच्या नव्या वाटा दिसतात.

शिल्पकार करमरकरांनी बरवे ह्यांना मॉडर्न आर्टच्या आहारी न जाण्याचा सल्ला दिला होता. पण प्रयोगशील वृत्तीमुळे बरवे यथार्थवादी शैलीत अडकून पडले नाहीत. मिनीएचर शैलीतील रेषेची काव्यात्मकता, द्विमितीय अवकाशाची हाताळणी व अवकाशाचे एक वेगळे भान बरवेंच्या चित्रात आले. काही काळ तंत्र आर्टचा प्रभावही त्यांच्यावर राहिला. त्यांच्या दृष्टीने चित्रकलेत जाणवणारे पाश्चिमात्य साम्य हे केवळ वरचे टरफल होते. त्यामागचे हेतू, प्रेरणा व संदर्भ पूर्णतः भारतीय होते. हे बरवे ह्यांच्याप्रमाणेच जे. स्वामिनाथन यांच्या बाबतीतही खरे होते.

आकार आणि अवकाशातील वेगवेगळी नाती शोधताना द्विमितीमधून त्रिमितीसारखे व अमूर्तामधूनही मूर्तासारखे सर्व काही सांगता येते. ही चित्रभाषा उलगडून सांगण्यासाठी डहाके ह्यांनी काव्यशास्त्रातील अभिधा (शब्दार्थ किंवा वाच्यार्थ), लक्षणा (लक्ष्यार्थ), आणि व्यंजना (व्यंग्यार्थ) या संज्ञा वापरल्या आहेत. बरवेंच्या चित्रांमध्ये

इमारत, भिंत, फुलपाखरू, सफरचंद अशा वस्तू असतात. या आकारांचे दृश्य रूप हा वाच्यार्थ असतो. या आकारांच्या संयोजनातून व्यंग्यार्थ सूचित होतो. बरवे ह्यांना त्यातून काही निराळा अर्थ अथवा संगती सुचवायची असते, तो चित्रार्थ. शब्दातून सांगता न येणाऱ्या अशा प्रतीयमान अर्थाची प्रतीती त्यातून येते. डहाके ह्यांनी काव्यशास्त्राच्या आधारे बरवे यांच्या चित्रांचे विश्लेषण केलेले आहे. चित्राचा मूलभूत पाया म्हणजे दृश्य-अदृश्याचा खेळ. काव्यामध्ये तो शब्दांच्या आधाराने जसा गोचर होतो तसा चित्रात आकार, रंग, अवकाश यांच्या आधारे प्रकट होतो. आकार आणि अवकाश ही एकाच सत्याची दोन नावे आहेत. बरवे यांच्या चित्रांमध्ये अवकाश अधिक तीव्रतेने जाणवतो तो त्यातल्या चित्रार्थामुळे.

आय, १९४६, मॉरित्स कॉर्नेलिस एशर

या संग्रहातला आणखी एक महत्त्वाचा लेख आहे तो एम. सी. एशर याच्यावरचा.

एशर दृष्टिभ्रमाचा साधनात्मक वापर करून आपल्या ग्राफिक्समधून डोळ्यांनी दिसणाऱ्या वास्तवाच्या समजुतींनाच आव्हान देतो. डहाके ह्यांनी एशरचा डोळा – वास्तवामागचे, वास्तवापलीकडचे वास्तव, त्याच्या चित्रातील आभास, भ्रम, दृश्य पातळीवर त्याने साधलेले अनेक चमत्कार आणि त्यामागचे कलात्मक प्रयोजन यांविषयी लिहिले आहे. चित्रकलेच्या माध्यमातून दृष्टिभान जागृत करणाऱ्या मॅग्रिटवर आणि वास्तवापलीकडचे अतिवास्तव चितारणाऱ्या साल्वादोर दालीवरदेखील या संग्रहात लेख आहेत.

दि. के. बेडेकर व संभाजी कदम यांच्यावरील लेख कलाविषयक मूलभूत प्रश्नांची चिकित्सा करतात. डहाके ह्यांचे हे पुस्तक साहित्य आणि दृश्यकला यांच्यातील नाते अप्रत्यक्षपणे अधोरेखित करते. भारतीय काव्यशास्त्र आणि आधुनिक कलेच्या, तसेच जागतिक कलेच्या पार्श्वभूमीवर समकालीन दृश्यकलेचे भारतीयत्व शोधायचे असेल तर ‘चित्रालोक’ पथदर्शक ठरेल.

आगामी पुस्तक

चित्रकृती पाहणे हे चित्रकृतीचे वाचन असते. आपण पाहतो, शांत होतो, अस्वस्थ होतो, विचारमग्न होतो, रंग आणि रेषा यांचे सौंदर्य अनुभवतो या विचारातून लिहिलेले काही लेख या पुस्तकात आहेत. दि. के. बेडेकर, सुधीर पटवर्धन, प्रभाकर बरवे, जगदीश स्वामीनाथन, बाळ ठाकूर, मंगेश नारायणराव काळे या भारतीय चित्रकारांबरोबरच व्हिन्सेंट व्हॅन गॉग, मॅग्रिट, रूसो, ब्रॉयघेल, दाली, एशर, शिरिको, जॅक-लुई डेव्हिड या विदेशी चित्रकारांच्या चित्रांविषयीचे लहानमोठे लेख येथे आहेत. काही भारतीय आणि काही पाश्चात्य चित्रकृतींकडे कसे पाहिले गेले आहे याचा एक आलेख या लेखसंग्रहात आहे.



लवकरच उपलब्ध !

"विनोद कुमार शुक्ल आज असते तर नव्वद वर्षांचे झाले असते. ... सुमारे बारा वर्षांपूर्वी २०१३ साली मुंबईत काळा घोडा फेस्टिव्हलमध्ये त्यांच्यासोबत झालेल्या ***जास्तीचे नाही*** *या त्यांच्या अनुवादित कवितासंग्रहाच्या प्रकाशनाची आणि त्यानिमित्ताने झालेल्या कवितावाचनाची आज प्रकर्षाने आठवण येत आहे. ..."*

जीवन जगण्याच्या अशा सवयीत जेव्हा मी मरेन...
स्मरण : विनोद कुमार शुक्ल

प्रफुल्ल शिलेदार



विनोद कुमार शुक्ल यांच्या कविता सुरुवातीला 'पहचान सिरीज' या मालिकेतून १९७१ मध्ये प्रकाशित झाल्या आणि त्यानंतर १९७९ मध्ये त्यांची 'नौकर की कमीज़' ही कादंबरी प्रकाशित झाली. हे बघता आपल्या लक्षात येईल

की कविता आणि कथात्म साहित्य या दोन्ही माध्यमांतून ते सुरुवातीपासून लिहीत होते आणि आपल्याला सुचलेल्या लेखनाची गरज पाहून घाटाची निवड करीत होते. ते म्हणायचे ‘कविता एखाद्या कादंबरीप्रमाणे वाचली जायला हवी. गद्यात कवितेचा विस्तार होतो तर कवितेत गद्याचा संक्षेप होतो.’ या दोन्ही घाटांच्या वैशिष्ट्यांची आणि सोबतच सर्जनशील भाषेची त्यांना सूक्ष्म समज असल्यामुळे ते या दोन्ही प्रकारात लक्षणीय साहित्यनिर्मिती करू शकले. भारतीय कथनपरंपरेत रुजलेला जादुई वास्तववाद त्यांनी आपल्या लेखनातून आणला आणि वास्तवासोबतच लेखनातील अद्भुताचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. आपल्या लेखनातून समाजाने फारसे महत्त्व न दिलेल्या, दुर्लक्ष केलेल्या, समाजाच्या परीघावर असलेल्या वर्गाला त्यांनी केंद्रस्थानी ठेवले आणि त्याला जगण्याची उमेद दिली. महत्त्वाचे भारतीय लेखक ठरलेल्या विनोद कुमार शुक्ल यांच्या लेखनाची अशी अनेक वैशिष्ट्ये आहेत.

विनोद कुमार शुक्ल आज असते तर नव्वद वर्षांचे झाले असते. त्यांच्याशी झालेल्या भेटींमधून सदैव लक्षात राहील असे काहीतरी नेहमी हाती येत गेले. सुमारे बारा वर्षांपूर्वी २०१३ साली मुंबईत काळा घोडा



फेस्टिव्हलमध्ये त्यांच्यासोबत झालेल्या **जास्तीचे नाही** या त्यांच्या अनुवादित कवितासंग्रहाच्या प्रकाशनाची आणि त्यानिमित्ताने झालेल्या कवितावाचनाची आज प्रकर्षाने आठवण येत आहे. 'अतिरिक्त नहीं' हा त्यांचा हिंदीत गाजलेला कवितासंग्रह आहे. या संग्रहातील त्यांच्या बहुतांश कविता या आकाराने लहान पण त्यांच्या भाषेची विशिष्ट शैली अधोरेखित करणाऱ्या आहेत. त्यांच्या या संग्रहाच्या अनुवादाच्या पुस्तकाचे म्हणजे **जास्तीचे नाही** या पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या अनुवादित कविता संग्रहाचे प्रकाशन काळा घोडा फेस्टिव्हलमध्ये करायचे ठरले होते. त्या दृष्टीने त्यांना मुंबईला बोलावण्यासाठी हालचाली सुरू झाल्या. मुंबईत यायला विनोदजी फारसे उत्सुक नव्हते. फेस्टिव्हलच्या आयोजकांनी फोन केल्यानंतर त्यांनी

फारशी उत्सुकता दाखवली नाही. मी पुन्हा त्यांना फोन केला तेव्हा ते म्हणाले, "खरं सांगू का? मी मुंबईला घाबरतो. तिथल्या गर्दीला घाबरतो. मी खरंच यावं असं तुम्हाला वाटतं का? बघा, यापूर्वी मी एकदा मणी कौल 'नौकर की कमीज़'वर चित्रपट तयार करत होते तेव्हा आलो होतो. त्यांच्या आग्रहावरून मी मुंबईला आलो खरा, पण ते जर स्टेशनवर मला दिसले नसते तर या एवढ्या मोठ्या शहरात मी काय करू शकलो असतो, असा प्रश्न मला आजही पडतो. मला वाटतं मी आल्यापावली लगेचच्या गाडीने रायपूरला परतलो असतो."

त्यांना खरेच मुंबई शहराबद्दल किंवा कुठल्याही अवाढव्य वाढलेल्या शहराबद्दल फारसे प्रेम नव्हते. रायपूरसारख्या आकाराने लहान असलेल्या शहरात किंवा त्याहूनही लहान असलेल्या गावात त्यांचा जीव रमत असे. नागपूरला येत तेव्हा त्यांच्या मुलीच्या घराच्या आवारात खूप झाडं आहेत, त्यावर पक्षी येतात, नागपूर शहराची गती तशीही संथ आहे, म्हणून त्यांचा जीव रमायचा. मला हे ठाऊक होते.

मी म्हणालो 'विनोदजी, तुम्ही मुंबईला अवश्य या. मी स्वतः तुमच्या स्वागताला विमानतळावर हजर असेन आणि

तुम्हाला निरोप देईपर्यंत सोबत राहीन.' या आश्वासनानंतर ते यायला हो म्हणाले. त्यानुसार मी अणि पॉप्युलर प्रकाशनाच्या अस्मिता मोहिते, असे आम्ही दोघेही त्यांच्या स्वागतासाठी मुंबई विमानतळावर वेळेपूर्वीच पोहोचलो. ते एकटेच येणार होते. विमानतळाच्या गेटमधून बाहेत पडताना त्यांची नजर भिरभिरत होती. ते दिसताच मी त्यांना बघून दुरूनच हात उंचावला. त्यांना हायसे वाटलेले दिसले.

विनोदजींना सोबत घेऊन आम्ही तिघेही तिथून थेट महालक्ष्मीला पॉप्युलर प्रकाशनाच्या कार्यालयात गेलो. तिथे रामदास भटकळ आमची वाट पाहत होते. त्यांनाही विनोदजींना भेटायची उत्सुकता होती. सोबत हर्ष भटकळ होते. पॉप्युलर प्रकाशनाच्या कार्यालयात त्यांच्याशी भरपूर गप्पा झाल्या. तिथेच जेवून दुपारी आम्ही चर्चगेटवरील हॉटेलकडे निघालो. जाताना कारमधून ते या मुंबई शहराचे रंग निरखत होते. कार्यक्रम स्थळ काळा घोडा परिसरातील डेव्हिड ससून लायब्ररी हे होते आणि तिथून जवळच हॉटेल होते. त्यांना थोडा वेळ विश्रांती घ्यायला सांगून मी बाहेर पडलो कारण लगेचच संध्याकाळी पुस्तकाचे प्रकाशन आणि आमचे कवितावाचन होते. मूळ हिंदी कवितांचे वाचन ते करणार होते आणि त्यांनी कविता वाचल्यानंतर

मी त्यांच्या कवितेचा मराठी अनुवाद वाचणार होतो. कार्यक्रमाचे हे स्वरूप त्यांना आवडले होते. ‘मला भाषण वगैरे देता येत नाही’ असे सांगून त्यांनी काही बोलण्यास, भाषण वगैरे देण्यास नकार दिला होता. ते फक्त कविता वाचणार होते. तिथून निघण्यापूर्वी त्यांच्याशी थोडे बोलून संध्याकाळच्या कार्यक्रमात कुठल्या कविता वाचायच्या ते ठरवून घेतले. पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते होणार होते आणि ते या संग्रहावर बोलणार होते.

संध्याकाळी त्यांना घ्यायला मी गेलो तेव्हा ते तयार होऊन वाट पाहत बसले होते. आम्ही बोलत-बोलत निघालो. त्यांनी त्यांच्या आधीच्या मुंबई-भेटीविषयी आणि मणी कौल यांच्याविषयी बऱ्याच आठवणी सांगितल्या. काळा घोडा परिसरातील डेव्हिड ससून लायब्ररीच्या मागील लॉनमध्ये या कार्यक्रमासाठी बऱ्यापैकी लोक जमले होते. विनोद कुमार शुक्ल येणार हे कळल्याने मुंबईतले बरेच जाणकार श्रोते आवर्जून उपस्थित होते. रामदास भटकळ, आदिल जसावला, रणजीत होस्कोटे, जयंत पवार, जयप्रकाश सावंत, नीतीन रिंढे अशी बरीच लेखक मंडळी विनोदजींसाठी उत्सुकतेने आली होती.



पुस्तक प्रकाशन ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते झाले. ते विनोदजींच्या कवितांबद्दल आणि या पुस्तकाबद्दल आधी थोडक्यात बोलले. त्यानंतर सुमारे पाऊण तास कवितावाचन झाले. विनोदजी मूळ हिंदी कविता वाचत होते आणि त्यानंतर त्यांच्या कवितांचे मराठी अनुवाद मी पाठोपाठ वाचत होतो. वेळ संध्याकाळची होती आणि वातावरणात पिवळसर सोनेरी संधिप्रकाश पसरला होता. आजूबाजूच्या गर्द झाडांनी वेढलेलं ते इवलसं हिरवळीचं बेट विनोद कुमारांच्या उपस्थितीनं भारावून गेलं होतं. दोन्ही भाषांचे तानपुरेच जणू तिथे सुरात लागले होते.

माझ्याकरिता तर तो अविस्मरणीय अनुभव होता. विनोदजी अत्यंत ठाम अशा स्वरात, एकेका अक्षरावर नेमका जोर देत, संथ लयीत कविता वाचत होते. त्यांची कविता वाचायची शैली अत्यंत साधी होती. वाचनात नाट्यात्मकता कटाक्षाने टाळून नैसर्गिक चढउतारांसह ते कविता वाचत होते. त्यांची कविता प्रभावीपणे श्रोत्यांपर्यंत पोहोचत होती. त्यांच्या कवितावाचनाचा एकूण बाज सांभाळत मी त्यांच्या कवितांचे अनुवाद त्यांच्या मागून संथा गिरवावी तसे वाचण्याचा प्रयत्न करत होतो. एक कविता वाचून झाली की ते परत खुर्चीवर बसत आणि मी अनुवाद वाचायला उठत असे. मी अनुवाद वाचला की ते उठून पुढची कविता वाचत. यात इतर कुठलाही व्यत्यय पूर्णपणे टाळला होता. त्यामुळे त्या घटकेत एक प्रकारचा दुपेडी एकसंधपणा जाणवत होता. सारे एकाग्रपणे ऐकत तो क्षण मनात साठवून घेत होते. सुमारे पाऊण तास चाललेल्या त्या कार्यक्रमानंतर विनोदजी त्या छोट्याशा, उजळलेल्या मंचावरून उतरले आणि लोकांमध्ये मिसळून गेले.

***

विनोद कुमार शुक्ल यांच्या कवितांच्या 'जास्तीचे नाही' या मराठी अनुवादित कविता संग्रहाविषयी ज्येष्ठ साहित्य समीक्षक, कवी वसंत आबाजी डहाके यांनी लिहिलेल्या लेखातील हा पुढील भाग खास 'प्रिय रसिक'च्या वाचकांकरिता...

भाषांतरित संहितेचे नाते दुहेरी स्वरूपाचे असते. एका बाजूला तिचे मूळ, स्रोत भाषेतील साहित्याशी नाते असते, तर दुसऱ्या बाजूला लक्ष्य भाषेतील साहित्याशी. भाषांतरित कृतीच्या माध्यमातून आपण स्रोत भाषेतील साहित्यकृतीचे आकलन करून घेत असतो. भाषांतरित साहित्यकृती बहुधा एखाद्या बेटासारख्या असतात. त्या साहित्यकृतीच्या कर्त्याचे इतर साहित्य मराठीत नसते, किंवा तो साहित्यकार ज्या प्रवाहाचे, काळाचे प्रतिनिधित्व करत असतो त्या प्रवाहातले, त्या काळातले इतर साहित्य मराठीत नसते. त्यामुळे त्या बेटासारख्या वाटू नयेत यासाठी एखाद्या लेखकाचे समग्र किंवा मोठ्या प्रमाणातले साहित्य लक्ष्य भाषेत यायला पाहिजे. हिंदीतील साठोत्तरी, नव्वदोत्तरी कविता आणि कवी मराठीत आलेले आहेत, येत आहेत. श्रीकांत वर्मा, अशोक वाजपेयी, चंद्रकांत देवताले, विष्णू खरे, मंगलेश डबराल,

राजेश जोशी, पवन करण इत्यादींची कविता संग्रहरूपाने मराठीत आलेली आहे, येत आहे. त्यामुळे **जास्तीचे नाही** या संग्रहाच्या रूपाने विनोद कुमार शुक्ल यांची कविता मराठीत येत आहे, या घटनेचे स्वागत केले पाहिजे. हा एक संग्रहदेखील मराठी वाचकांना विनोद कुमार शुक्ल यांच्या कवितेचा स्वभाव समजून घेण्याच्या दृष्टीने पुरेसा आहे.

प्रस्तुत संग्रहातल्या कवितांची तीन भागांत विभागणी केलेली आहे. विनोद कुमार शुक्ल यांच्या कवितेच्या बाबतीत वैयक्तिक, सामाजिक, आध्यात्मिक, प्रयोगशील अशी वर्गवारी करता येत नाही. आशय-विषयसूत्रांच्या दृष्टीने इथे अशी विभागणी केलेली असावी. दुसऱ्या भागात आत्मिक अनुभवाची अभिव्यक्ती म्हणता येतील अशा काही रचना आहेत. इथे एका कवीचा अध्यात्मभाव व्यक्त झाला आहे. *या गर्दीत तिच्या दिसण्यात राहू इच्छितो, तिच्या दिसण्यात माझ्या दिसण्याने एकरूप* अशी कवीची इच्छा आहे. कवी म्हणतात, *मला अलख पाहायचे आहे - प्रेमाचे भस्म माथ्यावर लावून, तिच्या असण्यात स्वतःला राख करून टाकण्याचे.* याच कवितेचे दुसरे रूप वाटावे अशा दुसऱ्या कवितेत कवी म्हणतात, *माझ्या असण्याने, तिच्या*

असण्यात, विरघळून जाऊ पाहतो. असा अध्यात्मभाव अलीकडच्या कवितेत दुर्मीळ झालेला आहे. या विभागाच्या शेवटच्या कवितेत तर तो अतिशय सूक्ष्मपणे व्यक्त झाला आहे. या कवितेची पहिली ओळ आहे :

आमच्या येण्याचा थोडा आवाज झाला होता.

मूकपण हाच चिरंतन भाव असलेल्या एका स्थलावकाशाचे चित्रण केल्यानंतर कवी म्हणतात,

आमचे मन
आमच्या निघून जाण्याचा आवाज
तिथे सोडून जाण्यास धजत नव्हते.

तिसऱ्या भागात वैयक्तिक-सामाजिक यांतल्या धूसर सीमारेषेवरच्या कविता आहेत. कदाचित या कवितेत दंगलीमधील संहारातून काही वाचले असेल का असा व्याकूळ प्रश्न आहे.

शक्य आहे एखाद्या घरात वाचले असेल
बांधलेले कोकरू, कुत्र्याचे पिलू
काळी कोंबडी किंवा पिंजऱ्यातला राघू
कदाचित नसेलही.

या कवितेत हिंसाचाराचा नव्हे तर मानवी मनातील क्रूरतेचा, हिंस्रतेचा वेध घेतलेला आहे. घरातली सगळी माणसे वेचून ठार मारल्यानंतर हिंसेच्या त्या बीभत्स उद्रेकात घरातले पाळीव प्राणीही बळी पडलेले असतील. उसळत सळसळत मधल्या मुलीला फ्रॉक सोडून साडी नेसायला सांगितले जाते. तर त्यासाठी आडोसा उरलेला नसतो. झाड, जंगल, धानाचे शेत, तलाव, डोंगर यांपैकी काहीही उरत नाही. कमरेखाली जमीन आणि कमरेच्या वर आकाश होण्यावाचून गत्यंतर नसते. अनेक अंगांनी या कवितेतकडे पाहता येईल. वयात येणाऱ्या मुलीसाठी एक आडोसादेखील शिल्लक राहत नाही, नुसतेच दूरपर्यंत पसरलेले मोकळे मैदान. **पिंजऱ्यातल्या पक्ष्याला** ही एक उत्कृष्ट कविता आहे. या कवितेतले कोणीएक विश्वनाथ एकदा बेतव्याला गेलेले असताना नदीच्या वाहत्या पाण्यातून एक वाटोळा दगड उचलून आणतात. बरेच दिवस तो त्यांच्या घराच्या अंगणात पडून असतो. त्या दगडाला त्याच्या रहिवासातून काढून त्यांनी जणूकाही त्याला बंदिस्त केले होते. दुसऱ्यांदा बेतव्याला जाताना ते तो दगड सोबत घेऊन जातात आणि

पूर्वी जिथे तो दगड होता तिथेच ठेवून परत येतात. कवी म्हणतात,

> पकडलेल्या दगडाला सोडून मुक्त केले
> स्वतः अमुक्त झाले.

जंगलातल्या ओसाडीत या कवितेत काही दिवसांपासून चालत आलेली एक आदिवासी कथा आहे, ती कथा भुकेविषयीची, उपासमारीने मरून जाणाऱ्या आदिवासींविषयीची आहे.

विनोद कुमार शुक्ल यांच्या कवितांतून सर्वच सामान्यांविषयीचा सहानुभव व्यक्त होतो. पहिल्या भागाच्या सुरुवातीलाच सर्व आशा नष्ट झालेल्या माणसाविषयीची कविता आहे. एकमेकांना न ओळखणाऱ्या माणसांमध्ये हताश होणे ओळखीचे होते, हात पुढे करणे ओळखीचे होते, सोबत चालणे ओळखीचे होते. माणसाचे माणसाशी असलेले पुरातन काळापासूनचे नाते कवी येथे अधोरेखित करतात. ती व्यक्ती ओळखीची नसली तरी माणूसपण ओळखीचे होते. हेच माणूसपण विनोद कुमारांच्या कवितांमधून आढळते. उदाहरणार्थ, *आपल्या हिश्शात लोक*

आकाश पाहतात या कवितेत कवीने सर्वांच्या वाट्याविषयी आणि पुष्कळांच्या अभावाविषयी लिहिले आहे : सर्वसामान्य लोक आपल्या हिश्शातले आकाश पाहतात आणि अख्खे आकाश पाहून घेतात. परंतु आपल्या हिश्शाच्या भुकेसोबत आपल्या हिश्शाचा सगळा भात मिळत नाही, किंवा बाजारात तंदूरच्या भट्टीत होणारी रोटी सगळ्यांच्या वाट्याला येणारी रोटी नसते. या सामान्यांमध्ये भाव करताना रुपयाला पालकाच्या दहा जुड्या म्हणणारी आणि देताना बारा जुड्या देणारी भाजीवाली आजी आहे. याच सामान्यांमध्ये शेताचा शेवटचा तुकडा आणि आपले शेतकरी असणे वाचवू न शकलेला शेतकरी आहे. याच सामान्यांमध्ये ऑफिसातल्या मुलीला चार गुंड जबरदस्तीने नेऊ लागतात तेव्हा थंडपणे आपल्या घड्याळात किती वाजलेले आहेत हे पाहणारे कर्मचारी आहेत. गोल गुबगुबीत मुलांची टांगलेली चित्रे आणि त्यांविषयी निषेध व्यक्त करणारी मुले. मुले आपला निषेध अबोल्याच्या रूपाने व्यक्त करतात. सामान्य माणसांमधला जिव्हाळा, प्रेम, आस्था, त्यांचे भय, अगतिकता, निर्ढावलेपण, तटस्थता अशा सगळ्या मुद्रा विनोद कुमारांच्या कवितेत येतात. आपल्या अवतीभवतीचे

किड्यामुंग्याचे जग ते अतिशय आस्थेने, सहानुभूतीने, जिव्हाळ्याने व्यक्त करतात. त्या जगातले हेवेदावे आणि प्रेम या दोन्ही गोष्टी त्यांच्या कवितेत येतात. कोणत्याही प्रकारचा आक्रस्ताळेपणा, चिडखोरपणा, दाखवेगिरी या गोष्टी त्यांच्या कवितेत नाहीत. अतिशय ऋजू, सहानुभवपूर्ण, आस्थेवाईक अशी त्यांची रचना आहे. त्यामुळे ती कोमल आहे. परंतु त्या कोमलतेच्या मागची विचाराची धग वाचकांना जाणवते.

आतापर्यंतचा हा मजकूर शिलेदार यांच्या अनुवादित संहितेवर आधारित आहे. हिंदीतून आलेली, पण मराठी कवितेत समाविष्ट करता येईल अशी कविता म्हणून मी तिचे वाचन केले. किंबहुना कविता म्हणूनच मी तिचे वाचन केले. हिंदी की मराठी असा काही प्रश्न नव्हता. मराठीत अनुवादित कविता ही मूळ ग्रीक, अरबी, जर्मन, स्पॅनिश, तुळू, मल्याळी असली तरी ती मराठी कविताही असते, आणि ती कविता असते. प्रफुल्ल शिलेदार यांनी हिंदीतील एका महत्त्वाच्या कवीची अतिशय महत्त्वपूर्ण कविता मराठीत आणली याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन.

विनोद कुमार शुक्ल यांच्या अतिरिक्त नहीं या संग्रहातील दोन कविता आणि 'जास्तीचे नाही' या संग्रहातील त्या कवितांचे प्रफुल्ल शिलेदार यांनी केलेले मराठी भाषांतर.

हताशा से एक व्यक्ति बैठ गया था

हताशा से एक व्यक्ति बैठ गया था
व्यक्ति को मैं नहीं जानता था
हताशा को जानता था
इसलिए मैं उस व्यक्ति के पास गया
मैंने हाथ बढ़ाया
मेरा हाथ पकड़कर वह खड़ा हुआ
मुझे वह नहीं जानता था
मेरे हाथ बढ़ाने को जानता
था हम दोनों साथ चले
दोनों एक दूसरे को नहीं जानते थे
साथ चलने को जानते थे

हताश होऊन एक माणूस बसला होता

हताश होऊन एक माणूस बसला होता
माणूस ओळखीचा नव्हता
हताश होणे ओळखीचे होते
सबब मी त्या माणसाजवळ गेलो
मी हात पुढे केला
माझा हात धरून तो उभा राहिला
तो मला ओळखत नव्हता
माझे हात पुढे करणे ओळखीचे होते
आम्ही दोघे सोबत चालू लागलो
दोघेही एकमेकांना ओळखत नव्हतो
सोबत चालणे ओळखीचे होते.

उसने उसके स्पर्श का

उसने उसके स्पर्श का अनुमान लगाना चाहा
लगा कि अनुमान में स्पर्श का रूप आ रहा है
उसने अनुमान लगाया अग्नि
वह थोड़ा जल गया।
उसने अनुमान लगाया जल
वह थोड़ा भीग कर डूब गया।
उसने धूप का अनुमान लगाया
और उसने छुआ कि सूर्य को ढँके हुए बादल
हट गये हैं।
उसने अंतरिक्ष का अनुमान लगाकर
ऐसा गहरा स्पर्श किया
कि नक्षत्रों की बाढ़ में
वह थोड़ा डूबकर भीग गया।

जब उसने उसके स्पर्श का अनुमान
लगाना चाहा
तब वह उसके स्पर्श का अनुमान
ठीक-ठीक नहीं लगा सका।

त्याला तिच्या स्पर्शाचा

त्याला तिच्या स्पर्शाचा अदमास घ्यावासा वाटला
अदमासात स्पर्शाचा गुण येतो आहे हे जाणवले
त्याने अग्नीचा अदमास घेतला
तो थोडा भाजला.
त्याने पाण्याचा अदमास घेतला
तो थोडा भिजून बुडाला.
त्याने उन्हाचा अदमास घेतला
आणि त्याने हात लावताच सूर्य झाकोळून टाकणारे
ढग दूर झाले.
त्याने अंतराळाचा अदमास घेऊन
असा काही गहिरा स्पर्श केला
की नक्षत्रांच्या लोंढ्यात तो डुंबून चिंब झाला.

जेव्हा त्याला तिच्या स्पर्शाचा अदमास घ्यावासा
वाटला तेव्हा तो तिच्या स्पर्शाचा अदमास
नीट घेऊ शकला नाही.

अलविदा प्रिय कवी

विनोद कुमार शुक्ल

१९३७ - २०२५

विनोद कुमार शुक्ल यांच्यामधला कवी स्वत:ची अकल्पनीय अशी नित्यनूतन रूपे दाखविते आहे ही गोष्ट या संग्रहातून आश्चर्यकारकरित्या पुढे येते. त्यांचीच प्रतिमा वापरून सांगायचे झाल्यास त्यांची कविता सगळ्यांच्या आवाजाचा कोरस सामावून घेतलेला जलप्रपात आहे. ते नि:संशयपणे आजच्या आमच्या सर्वश्रेष्ठ कवींपैकी एक आहेत.

— विष्णू खरे



किंमत ₹.१६०.००

पुस्तक खरेदीसाठी खालील लिंकवर क्लिक करा किंवा QR Code स्कॅन करा.

www.popularprakashan.com
https://shorturl.at/t8fuu

amazon.in
https://shorturl.at/mhJNJ

दास्तान-ए-तुर्की

‘पॉप्युलर प्रकाशन’ हे मागील काही वर्षांपासून उत्तमोत्तम निवडक तुर्की साहित्याचा आणि त्यातही मुख्यत्वे तुर्की कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद वाचकांकरिता घेऊन येत आहे. अशाच काही मराठी अनुवादित तुर्की कादंबऱ्यांच्या परिचयाची लेखमाला - ‘दास्तान-ए-तुर्की’ - आपण ‘प्रिय रसिक’मध्ये सुरू केलेली आहे. या सर्व कांदबऱ्या विविध बाजाच्या, विषयाच्या, शैलीच्या आणि मुख्य म्हणजे वाचकांना खिळवून ठेवून खऱ्या अर्थाने वाचनानंद देणाऱ्या आहेत. या मालेतील सर्व कादंबऱ्यांचा परिचय प्रवीण कलंत्री हे एक रसिक-वाचक करून देत आहेत...

टयूलिपच्या बागा माझ्या छायेत

गुल इरेपोलू

अनुवाद : ललिता कोल्हारकर

लेखिका गुल इरेपोलू यांना तुर्कीतील कला आणि साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. शिवाय त्या युनेस्को तुर्की राष्ट्रीय कमिशनच्या सदस्य आणि सांस्कृतिक वारसा विशेष समितीच्या अध्यक्षा आहेत. एकूण २६ हून अधिक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. ही पुस्तके कला-इतिहास आणि साहित्य यांवर आधारीत असून त्यांची लेखनशैली वेधक आहे. गुल इरेपोलू २०१६ मध्ये भारतातील साहित्यिक कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

ऑटोमन साम्राज्य पूर्णपणे बहरात असतानाचा अठराव्या शतकाच्या पूर्वार्धाचा काळ हा शांतता, समृद्धी, कला आणि विलासासाठी ओळखला जातो. जेव्हा कॉन्स्टँटिनोपलमध्ये (आत्ताच्या इस्तंबूलमध्ये) ट्युलिपचे वेड शिगेला पोहोचले होते, त्याच काळाला ट्युलिप युग म्हणूनही ओळखले जाते. या कालखंडाच्या पार्श्वभूमीवर

घडणारी ऐतिहासिक सत्य आणि काल्पनिक घटना यांचे बेमालूम मिश्रण असलेली ही कादंबरी.

प्रेमसंबंध, राजकीय सत्ता मिळवण्याचे डावपेच आणि विश्वासघात यांमुळे राजवाड्याच्या भिंतींआडचे जीवन किती धोकादायक आणि अनिश्चित असू शकते याचे वेधक चित्रण यात केले आहे.

ऑटोमन साम्राज्याचा तिसरा सुलतान अहमद. त्याच्या अगदी जवळचा समजला जाणारा कवी आणि चित्रकार असलेला अब्दुल जलील चेलेबी ऊर्फ लेवणी, सुलतानाचा जावई आणि वजीर असलेला इब्राहिम पाशा, जनानखान्यातील स्त्रिया यांच्याभोवती सगळे कथानक फिरते.

साम्राज्याच्या वेगवेगळ्या भागांत राहणारी आठ ते वीस या वयोगटातील शारीरिक व बौद्धिक क्षमता चांगली असणारी मुले निवडून, त्यांना खास प्रशिक्षण देऊन साम्राज्याच्या सेवेत सामील केले जायचे. जर ती इतरधर्मीय असतील तर त्यांचे धर्मांतर करून घेतले जायचे. या पद्धतीला देवशिर्मे पद्धत म्हणत. मूळ ख्रिश्चन असलेला लेवणी याच पद्धतीने निवडला जाऊन साम्राज्याच्या सेवेत आला होता. आपल्या अंगभूत कलेने आणि प्रेमळ स्वभावाने त्याने सुलतानाचा विश्वास संपादन केला होता. त्याने

दरबारातील वेगवेगळे प्रसंग, वेगवेगळ्या घटना, अनेक आठवणी कवितेच्या व चित्राच्या माध्यमातून संग्रहित केलेल्या आहे.

जनानखान्यातील स्त्रिया वरवर बघता एकमेकींशी खेळीमेळीने जरी वागत असल्या तरी जर एखादी स्त्री गरोदर असेल तर मात्र सगळ्यांचे लक्ष तिच्याकडे लागलेले असते. तिला जर मुलगी झाली तर काही हरकत नाही; मात्र मुलगा झाला तर षड्यंत्रांना ऊत येऊ लागतो. कारण साम्राज्याचा अजून एक वारस जन्मलेला असतो.

सुलतानाचे चित्रणही अनोखे आहे. सर्वसाधारण माणसाप्रमाणे त्याच्यातही काही उणिवा आहेत. प्रसंगी छोट्या-छोट्या गोष्टीत आनंद शोधणारा हा सुलतान चित्रकार लेवणीशी अत्यंत जवळीक साधणारा आहे.

सुलतानाचे जनानखान्यातील स्त्रियांबरोबर असलेले संबंध, एका फ्रेंच मुलीवर बसलेले प्रेम, त्या प्रेमाने तिच्यासाठी व्याकूळ झालेला, काहीसा हळवा असलेला सुलतान नेहमीच हिंसा, रक्तपात, युद्ध यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. भविष्यात आपल्याला कसे आठवणीत ठेवतील याचा विचार करणारा सुलतान काही वेळा अगदी भाबडा वाटतो.

वजीर इब्राहिम पाशा वयस्कर असला तरी हाती एकवटलेल्या सत्तेमुळे काहीसा उन्मत्त झालेला, मुख्य न्यायाधीशांच्या तरुण पत्नीची अभिलाषा बाळगतो.

राजघराण्यातील लोकांची अतिविलासी जीवनशैली, आणि समाजातील वाढलेल्या आर्थिक विषमतेमुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात हळूहळू वाढणारा असंतोष खदखदत असतो. पुढे हा असंतोष बंडाद्वारे प्रगट होऊन विलासी जगण्याचे ट्युलिप युग अस्तंगत होते.

कथानकातून केवळ ट्युलिप युगाचा इतिहास सांगितला जात नाही; तर वैभव, सत्ता आणि मानवी अस्तित्वाची क्षणभंगुरता यांवरही भाष्य होते. एका अत्यंत महत्त्वाच्या ऐतिहासिक काळाचे आणि संस्कृतीचे अनेक पैलू समोर येतात. तत्कालीन समाजाच्या जीवनशैलीचे, वैभवशाली महाल, संगीत आणि खाद्यसंस्कृतीचे वर्णन अत्यंत बारकाईने केले आहे. भाषाशैली सुंदर आणि वेधक असून अनुवादही तितकाच उत्कंठावर्धक, सुरस आणि प्रवाही झालेला आहे, जो वाचकांना थेट ऑटोमन दरबारात घेऊन जातो.

गुल इरेपोलू लिखित

ट्यूलिपच्या बागा

माझ्या छायेत

अनुवाद : ललिता कोल्हारकर

पुस्तक खरेदीसाठी खालील
लिंकवर क्लिक करा
किंवा QR Code स्कॅन करा.

www.popularprakashan.com

https://surl.li/ivbhnf

amazon.in

https://surl.li/mfvwgq



किंमत
₹.३७५.००

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध !



गौरवान्वित !!!

कन्नड भाषेतील प्रसिद्ध कवी कुप्पाली वेंकटप्पा पुट्टप्पा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुवेंपु राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार २०१३ सालापासून दिला जातो. दरवर्षी विशिष्ट एका भाषेत महत्त्वपूर्ण साहित्यिक योगदान दिलेल्या साहित्यिकास हा पुरस्कार देण्यात येतो. यंदा २०२५ करिता कुवेंपु राष्ट्रीय पुरस्कार हा ज्येष्ठ कोंकणी आणि मराठी लेखक महाबळेश्वर सैल यांना प्रदान करण्यात आला. त्यांचे पॉप्युलर प्रकाशनातर्फे हार्दिक अभिनंदन !!!

महाबळेश्वर सैल यांची पॉप्युलरतर्फे प्रकाशित झालेली पुस्तके



किंमत ₹. २७५/-

किंमत ₹. ४३५/-

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक हर्ष भटकळ यांनी पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. यांचेकरिता ३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ येथे प्रसिद्ध केले. संपादक : अस्मिता मोहिते.